ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

Attested

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

# EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.


Attested

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)


PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या सामाजिक विचाराचा संवादात्मक अभ्यास<br>**विद्या मधुकरराव इंगोले** | १३२-१३४ |
| २५ | गांधी विचाराची सद्यस्थितीतील प्रस्तुतता - एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. ढाले एस. यु.** | १३५-१३९ |
| २६ | धनगर जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**डॉ. एन. आर. हुरगूळे** | १४०-१४५ |
| २७ | हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात काॅं. विठ्ठलराव नाईक यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर** | १४६-१५० |


Attested

**Assistant Professor**
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# २७. हैद्राबाद स्वातंत्र संग्रामात काँ. विठ्ठलराव नाईक यांचे योगदान

**प्रा. डॉ. बाळासाहेब शंकरराव क्षिरसागर**
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**प्रस्तावना**

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम हा भारताच्या स्वातंत्र्य संग्रामाला पुर्णत्व देणारा एक महत्वाचा स्वातंत्र्य संग्राम असुन स्वतंत्र भारताच्या इतिहासातील ते एक जागरूक पर्व आहे. हैद्राबादचे राज्य 'निजाम' राज्य उर्फ आसिफजहा घराण्याचे राज्य या नावाने ओळखले जाते. त्यामुळे हैद्राबाद संस्थान हे निजामाचे संस्थान अर्थात राज्य म्हणुनच इतिहासात प्रसिध्द आहे. या हैद्राबाद संस्थानात एतेहादूल मूसलमीन ही कडवी धार्मीक संघटनेने संस्थानात दहशत निर्माण केली. हैद्राबाद संस्थानातील जनतेने हैद्राबाद स्टेट काँग्रेसच्या माध्यमातून निजामाशी संघर्षाचा लढा सुरु केला. भारत स्वतंत्र झाल्यावर या लढ्याने उग्र स्वरुप धारण केले. त्यात जंगल सत्याग्रह, शिंदीची झाडे तोडणे, उपोषण इ. अहिंसक मार्गाचा अवलंब केला. रझाकार संघटनेच्या अत्याचाराला समर्थपणे तोंड देण्यासाठी संस्थानाच्या सीमावर्ती भागात स्टेट काँग्रेसने सशस्त्र कँप उभारले. तत्कालीन परभणी जिल्हयातील कळमनूरी तालूक्यासाठी शेंबाळपिंप्री तालूका. पूसद जि. यवतमाळ येथे १० नोव्हेंबर १९४७ रोजी कॅम्पची स्थापना करण्यात आली.[१] स्टेट काँग्रसचे कळमनूरी तालूका संघटक दिपाजी पाटील यांची शेंबाळपिंप्री कॅम्प प्रमुख व पुरभाजी पाटील यांची कॅम्प उपप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. तर विठ्ठलराव नाईक यांची कॅप्टनप्रमुख म्हणुन नियुक्ती करण्यात आली. काँ.विठ्ठलराव नाईक यांनी स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्ता म्हणुन केलेले जनजागृतीचे कार्य निजाम सरकारशी दिलेला लढा, जंगल सत्याग्रहामधील सहभाग, गाडीबोरी करोडगिरी नाक्यावरील हल्ला, दूलाजी पाटलाचा बंदोबस्त यामध्ये त्यांनी दिलेले योगदान अत्यंत महत्वाचे आहे. याविषयी सखोल अभ्यास करण्यासाठी मी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

**उद्दिष्टे**

प्रस्तुत विषयावर शोधनिंबध लिहित करीत असतांना खालील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१. काँ. विठ्ठलराव नाईक यांनी शेंबाळपिंपरी कॅम्पचे कॅप्टनप्रमुख म्हणून केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

२. काँ. विठ्ठलराव नाईक यांच्या हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाचा अभ्यास करणे.

**गृहितके**

प्रस्तुत विषयावर शोधनिंबध लिहित करीत असतांना खालील गृहितके निश्चित केली आहेत.

१. काँ.विठ्ठलराव नाईक यांनी शेंबाळपिंपरी कॅम्पचे कॅप्टनप्रमुख म्हणून उल्लेखनीय कार्ये केले आहे.

२. काँ. विठ्ठलराव नाईक यांचे हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील योगदान महत्वाचे आहे.



Attested
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Ta.& Dist.Hingoli.(MS.)

**कॉं. विठ्ठलराव नाईक यांचे हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील योगदान**

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम हा अन्यायी राजवटीविरुध्द जनतेला पुकारलेला लढाहोता. निजाम शासनाविरुध्द कळमनुरी तालूक्यामध्ये विठ्ठलराव नाईक यांनी स्टेट कॉंग्रेसच्या माध्यमातुन लढा देण्यास सुरुवात केली. या परिसरात त्यांनी अनेक सत्याग्रह केले. स्टेट कॉंग्रेसचे सेक्रेटरी असतांना त्यांनी सभा, भेटी घेऊन या परिसरात स्टेट कॉंग्रेसच्या ध्येयधोरणाचा प्रचार केला. त्याचबरोबर लोकांमध्ये जागृतता निर्माण केली.[२]

**जंगल सत्याग्रहामध्ये योगदान**

विठ्ठलराव नाईक यांनी कळमनुरी तालूक्यामध्ये सत्याग्रह केले. यामध्ये त्यांनी केलेला जंगल सत्याग्रह उल्लेखनीय आहे. या सत्याग्रहामध्ये त्यांनी सिंदीची झाडे तोडून निजामाचे १२ कोटीचे उत्पन्न कमी केले. निजामाची आर्थिक कोंडी केली. १५ सप्टेंबर १९४७ पासून जंगल सत्याग्रहास प्रारंभ झाला होता. चळवळ विस्तृत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या विविध भागात दौरे केले. प्रचारसभा घेतल्या लोकांच्या मनात सत्याग्रहाची कल्पना रुजविली. कळमनुरी तालूक्यात सत्याग्रहासाठी अनुकुल वातावरण निर्माण केले होते. या सर्वांमध्ये विठ्ठलराव नाईक आघाडीवर होते. दि. १५ फेब्रुवारी १९४७ रोजीकुर्तडी येथुन दिपाजी पाटलांच्या नेतृत्वाखाली जंगल सत्याग्रहास सुरुवात झाली. १५ सप्टेंबर १९४७ ते ३० सप्टेंबर १९४७ पर्यंत अनेक गावात दिपाजी पाटील, विठ्ठलराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी ५० ते ६० हजार शिंदीची व ७०० मोहाची झाडे तोडली. हा सत्याग्रह मोडून काढण्यासाठी त्यांनी दडपशाहीचा अवलंब केला. मिलिटरी, पोलीस व रझाकाराच्या मदतीने चळवळी करणाऱ्या गावांवर हल्ले चढविले. मालमत्ता, दागदागिने, धान्य व जनावरांची सर्रास लूट करण्यात आली. जनावराप्रमाणे निरापराध लोकांना मारुन जेलमध्ये डांबण्यात आले. दिपाजीपाटील, विठ्ठलराव नाईक यांच्यावर वारंट काढण्यात आले होते.[३]

**गाडीबोरी कॅम्पचे प्रमुख म्हणून योगदान**

विठ्ठलराव नाईक यांनी गाडीबोरी कॅम्पचे प्रमुख असतांना २६ नोव्हेंबर १९४७ रोजी गाडीबोरी नाक्यावर हल्ला चढविला. शेंबाळपिंपरी कॅम्पमधुनकळमनुरीतालूक्यातील सावरगांव, खानापुर, शिऊरनाकाहेकरोडगिरी नाके उद्ध्वस्त केले. त्यामुळे निजामाचे सैन्य व पोलीस घाबरले. त्यांनी १५ ते २० मैल माघार घेतली. या संधीचा फायदा घेऊन विठ्ठलराव नाईक यांनी ४० गावे स्वतंत्र केली.[४] या गावामध्ये ४ ऑगस्ट १९४७ पासुन या दिवशी सर्वत्र तिरंगी ध्वज उभारले व जाहीर सभा घेऊन गाव स्वतंत्र झाले असेत्यांनी जाहीर केले.

**भाटेगाव येथील रोहिल्यांचा बंदोबस्त**

भाटेगाव येथील जनतेवर रोहिला अमानुष अत्याचारकरीतहोता. हा रोहिला पोलिसांना गुप्त माहिती देत असे. त्यामुळे स्वतंत्र सैनिकांच्या लढ्यात अडथळा निर्माण होतहोता. या क्रुर रोहिल्याला ठार मारण्याची जबाबदारी शेंबाळपिंपरी कॅम्पचे प्रमुख दिपाजी पाटील यांनी विठ्ठलराव नाईक यांच्यावर सोपविली. या क्रुर रोहिल्यांना गोळ्या झाडून ठार मारले.[५] त्यांच्या मृत्युनंतर भाटेगाव येथील लोकांमधील दहशतकमी झाली.



Attested

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**गाडीबोरी अॅक्शन**

निजाम राजवटीत शेतसारा, अबकारी कस्टम हे उत्पन्नाचे महत्वाचे साधन होते. हैद्राबाद संस्थानाला विविध मार्गांनी वर्षाला २६ कोटीचे उत्पन्न मिळतहोते. हैद्राबाद संस्थाना लगतच्या वऱ्हाड प्रांताच्या सरहद्दीवर करोडगिरी नाकेहोते. या नाक्याला ५० हजार रुपये सरकारला मिळत असत. सरहद्दीवरुन जाणाऱ्या व संस्थानात येणाऱ्या मालावर ५ टक्के जकात आकारण्यात येत असे. निजामाच्या आर्थिक नाड्या आवळण्यासाठी कॉंग्रेसने जंगल सत्याग्रहीची मोहीम सुरु केली होती. या राजव्यापी मोहिमेत जनतेत स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण झाली. जंगल सत्याग्रहानंतर कृती समितीनेकरोडगिरी नाके जाळून बेचिराख करण्याची मोहिम हाती घेतली. पैनगंगा नदीच्या काठावर गाडीबोरी हा करोडगिरी नाका होता. या करोडगिरी नाक्याविषयी माहिती रामा वाणी यांनी काढली. या माहितीच्या आधारे विठ्ठलराव नाईक हे कामाठ्यांच्या वेषात नाक्यावर पोहचले. यावेळेस नाकेदार व त्याचे सहकारी दारुच्या नशेमध्ये होते. यावेळेस विठ्ठलराव नाईक यांनीसंधी न दवडता ३० सैनिकांच्या सहाय्याने नाक्याला वेढा दिला. तेथील रोहिल्यांना पकडण्यात आले. नाकेदार व त्यांच्या चार साथीदारांना पकडून पैनगंगा नदीचे पलीकडे नेण्यात आले.[६] या अॅक्शनमध्ये केवळ भरमार बंदूका व तलवारी, भाले यांचाच वापर करण्यात आला. या अॅक्शनमध्ये स्टेटकॉंग्रेसचा रझाकारावर व शासनावर वचक बसला.

**येहळेगावचा देशद्रोही दूलाजी पाटील ठार**

येहळेगाव येथील दूलाजी पाटील हा तेथील स्थानिक जनतेवर अत्याचार करित असे. यासाठी त्याला भाटेगाव येथील रोहिल्याची मदत होती. भाटेगाव येथील रोहिला स्टेट कॉंग्रेसच्या गुप्त कारवाया पोलीस व मिलीटरीला कळवत असे. भाटेगाव येथील रोहिला व येहळेगाव येथील दूलाजी पाटील यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी शेंबाळपिंपरी कॅम्पने कॅप्टन विठ्ठलराव नाईक, माणिकराव टाकळगव्हाणकर, पुरभाजी पाटील, रावसाहेब वडगांवकर, मार्तंडराव नाईक, बापुजी मास्तर यांची निवड करण्यात आली. दि. १५ जानेवारी १९४८ रोजी ७० सैनिकांसह रात्री ८ वाजता सर्वजन शेंबाळपिंपरी कॅम्पकडुन सर्वजन निघाले. रात्री १२ वाजता येहळेगाव येथे पोहचले. तो दिवस एकादशीचा असल्याने गावात भजन सुरु होते. मंदिराच्या पुढील व मागील बाजुस सैनिक ठेवले. दुलाजी पाटील यांच्या वर हल्ला करण्यात आला. खिडक्याचे लोखंडी गज तोडून लोकांनी घरामध्ये प्रवेश केला. परंतू दूलाजी पाटलांचा शोध लागला नाही. पाटलाचा नौकर राठोड यास विठ्ठलराव नाईक यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. तेव्हा त्याने दुलाजी पाटलाचा पत्ता सांगितला. मरडगा या शेजारील गावी दूलाजी पाटील लपून बसले होते. त्यांनी प्रतिकार केला.[७] पण या प्रतिकारात देशद्रोही व फितूर दूलाजी पाटील ठार झाले.

**दादाराव नाईकाचा बंदोबस्त**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये हातामध्ये शिर घेऊन लढणारे शुर योध्दे होते. त्याचप्रमाणे परकीयांच्या गुलामगिरीमध्ये धन्यता मानणारे आणि स्वातंत्र्याची चळवळ क्षीणकरणाऱ्या स्वकीयांची संख्या फार मोठी होती. गावातील रयतेचे रक्षण करण्याऐवजी त्याचे शोषण करणारे पोलीस पाटील अनेकखेड्यामध्ये होते. त्यापैकी चिंचोर्डी येथील दादाराव नाईक हे होते. ते मुक्ती लढ्याला सर्व मार्गांनी विरोध करीत असत. जंगल सत्यागृहींना पकडून देणे. स्टेट कॉंग्रेस कार्यकर्त्याविरुध्द खटले भरणे आणि मुस्लिम अधिकाऱ्यांच्याद्वारे जनतेवर अनन्वित अत्याचार करणे. हे कार्य दादाराव नाईक



Attested
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

इमाने-इतबारे करीत होते. दादाराव नाईकांना त्यांच्या कृत्याबद्दल शिक्षा मिळायला हवी. अशी स्थानिक लोकांची मनोमन इच्छ्क्ह होती. यासाठी शेंबाळपिंपरी कॅम्पकडे तक्रारी येत होते. यामुळे ०१ जानेवारी १९४८ रोजी श्री विठ्ठलराव नाईक आणि माणिकराव टाकळगव्हाणकर यांनी बारा सहकाऱ्यासह चिंचोर्डीच्या परिसरात प्रवेश केला. त्यांच्याजवळ एक भरमार बंदूक, दोन पिस्तुले, तलवारी आणि काड्या होत्या. दि. ०२ जानेवारी १९४८ रोजी रात्री ९ वाजता सर्वजण चिंचोर्डी या गावात आले. दादाराव नाईक यांच्याकडे शेतसारा वसुलीची ५००० रु. एवढी रक्कम होती. पोलीस पाटलांच्या आणि ५००० रुपयांच्या संरक्षणासाठी दोन ठेवण्यात आले होते. विठ्ठलराव नाईकांनी पाटलांचा शोध घेतला. रात्री अंधाराचा फायदा घेऊन पोलीस पाटलाची बंदूक ताब्यामध्ये घेतली. शेतसाऱ्याची रक्कम ५००० रु. हस्तगतकेले. परंतू दादाराव नाईकांचा शोध लागत नव्हता. शेवटी ते कणगीत लपून बसलेले सापडले. त्यांना पकडून जेरबद करण्यात आले. त्याच दिवशी त्यांना शेंबाळपिंपरी कॅम्प येथे नेण्यात आले.[८]

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिंबधामध्ये तथ्य संकलनाद्वारे प्राप्त माहितीचे अध्ययन करुन निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

१. हिंगोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागामध्ये विदर्भात असणाऱ्या शेंबाळपिंपरी कॅम्पच्या सैनिकांनी रझाकाराविरुध्द दिलेला लढा, जिल्ह्यामध्ये केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

२. कॉं. विठ्ठलराव नाईक यांच्या नेतृत्वात शेंबाळपिंपरी कॅम्पच्या सैनिकांनी कळमनुरी तालूक्याच्या सरहद्दीवरील गाडीबोरी, सावरगाव, खानापूर, शिऊर नाका येथील करोडगिरी नाके नष्ट करुन ४० गावे स्वतंत्र केली.

३. कॉं. विठ्ठलराव नाईक यांच्या नेतृत्वात सैनिकांनी स्वतंत्र झालेल्या गावामध्ये किसान दलाची स्थापना करुन यांच्यावर गाव संरक्षणाची जबाबदारी दिली.

४. कॉं. विठ्ठलराव नाईक यांनी जंगल सत्याग्रह, शिऊर नाका, नांदापूर रेल्वे स्टेशन, गौळमांजरीची लढाई, गाडीबोरी अॅक्शनमध्ये दिलेले योगदान महत्वपुर्ण आहे.

५. कॉं. विठ्ठलराव नाईक यांचे हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामातील कार्ये महत्वपुर्ण आहे.

**सारांश**

कॉं. विठ्ठलराव नाईक यांनी साम्राज्यवाद विरोध, देशाचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व, देशाचे ऐक्य व धर्मनिरपेक्षता, सामाजिक व आर्थिक समता या मुल्यप्रस्थापनेसाठीं कार्ये केले. कळमनुरी विधानसभा मतदारसंघातून चार वेळेस निवडून आले परंतू त्यांचे सामान्य शेतकरी, शेतमजूर जनतेशी संबंध तुटले नाहीत. त्यांच्या समस्या सोडवण्यास त्यांनी प्राधान्य दिले. राजकारणातील व समाजकारणातील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून त्याची ओळख आहे. परंतू कॉं.विठ्ठलराव नाईक यांच्या नेतृत्वात हिंगोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागामध्ये विदर्भात असणाऱ्या शेंबाळपिंपरी कॅम्पच्या सैनिकांनी रझाकाराविरुध्द दिलेला लढा, जिल्ह्यामध्ये केलेले कार्य उल्लेखनीय आहे. या कार्याची व त्यांच्या हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाची माहीती सर्वसामान्य नागरिक, तरूण पिढीसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. शासनास व प्रशासनातील अधिकारी व राजकीय लोकप्रतिनिधी यांच्या दृष्टिने प्रस्तुत अध्ययन विषयाचे महत्व आहे.

Attested



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

**संदर्भसुची**

१. लोमटे, आसाराम., (सपा) (२००१), स्वातंत्र्य सैनानी कॉ विठ्ठलराव नाईक गौरव अंक, हिंगोली ता. जि.हिंगोली सिटी कल्ब मैदान हिंगोली.४७

२. लोमटे, आसाराम., (सपा) (२००१), स्वातंत्र्य सैनानी कॉ विठ्ठलराव नाईक गौरव अंक, हिंगोली ता. जि.हिंगोली सिटी कल्ब मैदान हिंगोली.४८

३. लोमटे, आसाराम., (सपा) (२००१), स्वातंत्र्य सैनानी कॉ विठ्ठलराव नाईक गौरव अंक, हिंगोली ता. जि.हिंगोली सिटी कल्ब मैदान हिंगोली.४९

४. चंपतराव नाईक (स्वा. सै. विठ्ठलराव नाईक यांचे पुत्र) यांच्याकडून मुलाखतीद्वारे प्राप्त माहिती.

५. स्वा. सै. माधवराव आप्पाराव मस्के यांच्याकडून मुलाखतीद्वारे प्राप्त माहिती.

६. सुर्यवंशी,उत्तम., टाकळगव्हाणकर,आण्णाराव., (१९८८) स्मरणीका,नांदेड,गणेश आर्ट प्रिंटर्स, प्रकाशन,२९

७. भालेराव,अनंत., (२००१), हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणी मराठवाडा, मुबंई, मोज प्रकाशन, खटवाडी गिरगाव, ३२

८. लोमटे,आसाराम., (सपा) (२००१), स्वातंत्र्य सैनानी कॉ विठ्ठलराव नाईक गौरव अंक, हिंगोली ता. जि.हिंगोली सिटी कल्ब मैदान हिंगोली.५१

Attested

**Assistant Professor**
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)